**माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर**

**सुनावणी ४/४/२००८**

१. श्री सुखदेव तुपसौंदर,
अध्यक्ष, भारतीय मानव अधिकार परिषद
२. श्री राजू देवकुळे,
सदस्य, भ्रष्टाचार निवारण संस्था
के.डी.जाधव चाळ, न्यु किरण हौ.सो.वेतूरकर पाडा,
कल्याण (पश्चिम), जिल्हाः ठाणे .... अर्जदार/ॲपेलंट

विरुध्द

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ .... उत्तरवादी/रिसपाँडंट

**आदेश**

सदरहू अपिल गैरसमजुतीने सचिव, पर्यावरण, प्रशासकीय इमारत, मुंबई-३२ यांच्याविरुध्द दाखल करण्यात आलेले होते. मात्र, प्रत्यक्षात अपिलीय प्राधिकरण, मप्रनि मंडळ यांच्या अखत्यारित सदर बाब येते. त्यामुळे मप्रनि मंडळाकडे सदरहू अपिल वर्ग करण्यात आले.

अर्जदारांनी (ॲपेलंट) २००६-२००७ या वर्षामध्ये किती कंपनींचे प्रदूषण नियंत्रण केले व विविध योजना व तरतूद व खर्च व ज्या कंपनीद्वारे प्रदूषण होत आहे, त्यांच्यावर काय कार्यवाही केली याबाबतची सविस्तर माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली होती. त्यानुसार अर्जदारांना असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे प्रत्येक विभागामध्ये व उप-विभागांमध्ये आणि मुख्यालय या स्तरावर प्रदूषण नियंत्रणाबाबत वेगवेगळी कारवाई केली जाते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रासाठी वरील माहिती घेणे व देणे, हे विस्तृत काम असून अशी माहिती गोळा करण्यास खूप मोठा कालावधी लागेल, या कारणास्तव माहिती अधिकारी यांनी कलम (९) नुसार माहिती अधिकार अधिनियम, २००५ विहित वेळेमध्ये देणे शक्य होणार नाही, असे कळविले होते.

मात्र, अर्जदारांना संबंधीत उद्योगधंदे ज्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली, त्यांची संपूर्ण माहिती हवी होती व माहिती अधिकारी (मुख्यालय) यांनी संपूर्ण महाराष्ट्रासाठीचा वेगवेगळया प्रादेशिक विभागानुसार खालील सांख्यिकी माहिती अर्जदारांना सादर केली.

१. ज्या उद्योगधंद्यांनी सांडपाणी प्रक्रिया संयंत्र किंवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेली आहे, याबाबत मार्च, २००७ पर्यंतची आकडेवारी

२. ज्या उद्योगधंद्यांविरुध्द, मे.न्यायालयामध्ये वेगवेगळया कलमांनुसार विभागवार कायदेशीर कारवाई करण्यात आली.

३. ज्या उद्यांगधंद्यांविरुध्द, मप्रनि मंडळाने प्रदेशिक विभागवार प्रस्तावित आणि बंदचे आदेश दिलेले आहेत, त्यांचा सांख्यिकी अहवाल दिलेला आहे.

अर्जदारांना असेही स्पष्ट करण्यात आले की, वरील सर्व जवळजवळ साडेपाचशे उद्योगधंद्यांची माहिती, नाव व पत्ते स्वरुपात, ज्या स्तरावर कायदेशीर कारवाई झाली तेथे उपलब्ध आहेत. त्यामुळे ही सर्व माहिती प्रत्येक विभागाकडून गोळा करण्यास मोठा कालावधी लागेल. जर अर्जदारांना ठराविक प्रादेशिक विभागातील वरील माहिती घेणे शक्य असेल तर त्यांनी सांगितलेल्या विभागांना सदरहू माहिती देण्याबाबत योग्य ते आदेश देता येतील.

त्यावर अर्जदारांनी ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि रायगड या प्रादेशिक विभागातील (२००६-२००७ कालावधीकरिता) वरील माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली.

येणेप्रमाणे विस्तृत माहितीचे स्वरुप पाहता, माहिती अधिकारी, मुख्यालय यांनी २००६-२००७या वर्षांकरिता उपलब्ध करुन दिलेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कल्याण, ठाणे, नवी मुंबई आणि रायगड यांनी त्यांच्या विभागातील २००६-२००७ मध्ये केलेल्या कायदेशीर कारवाईबाबतचा तपशील ज्यामध्ये उद्योगधंद्याचे नाव व पत्ता आणि केलेल्या कारवाईचे स्वरुप (कलम ३३ जल व २२ अ, हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियमांतर्गत दाखल केलेले अर्ज, खटले; कलम ३३ अ जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९७४ व ३१अ हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण)

अधिनियम, १९८१ अंतर्गत देण्यात आलेले आदेश वगैरे) याची माहिती अर्जदार (ॲपेलंट) यांना १५ एप्रिल, २००८ पर्यंत मराठीमध्ये उपलब्ध करुन द्यावी.

येणेप्रमाणे अर्जदार (ॲपेलंट) यांच्या सहमतीने अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक ४ मार्च, २००८ रोजी मुंबई येथून.

सही/-
( द. त्रि. देवळे )
ॲपिलेट ऑथॉरिटी
मप्रनि मंडळ